आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातमीपत्र
सकाळी 07 वाजून 10 मि.

दिनांक : 10.11.2026 **वार : सोमवार**

---

1. दुष्काळाशी दोन हात करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार ठामपणे उभं असल्याची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही
2. गोकुळच्या अध्यक्षपदाची निवडणूक आज नियोजित वेळापत्रकानुसारच होणार
3. धाराशिव तालुक्यातील येडशी आग दुर्घटनेत एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू आणि
4. अनुज श्रीवत्री भारताचा 100 वा ग्रँडमास्टर

दुष्काळग्रस्त दिवाळी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या अडचणी समजून घेण्याचं आवाहन मंत्र्यांना नुकतंच केलं होतं. त्यानुसार राज्यातले विविध मंत्री तसंच अनेक जिल्ह्यांचे पालकमंत्री शेतकरी बांधवांना भेट देऊन प्रत्यक्ष संवाद साधत आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल जालना जिल्ह्यातल्या मौजपुरी गावातल्या अंबादास तांगडे या शेतकऱ्याच्या घरी दिवाळी साजरी केली. दुष्काळाशी दोन हात करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार ठामपणे उभं असल्याची ग्वाही शिंदे यांनी यावेळी शेतकऱ्यांना दिली.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी मालेगावातील गाळणे गावातील ग्रामस्थांबरोबर दिवाळी साजरी केली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी काल शिवगड तांडा इथं दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी केली. यावेळी त्यांनी शेतकरी कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचं वाटप करून त्यांची विचारपूस केली.

जयकुमार गोरे

पंढरपूर तालुक्यातल्या सोनके इथं ऊसतोड कामगारांच्या पालावर जाऊन, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी कामगारांच्या कुटुंबीयांसोबत दिवाळी साजरी केली. ऊसतोड कामगारांची मुलं प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत असतात. या मुलांच्या शिक्षणात अडचणी येऊ नयेत, यासाठी त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणीच शाळा सुरू करण्याची व्यवस्था करण्यात येत असल्याची माहिती गोरे यांनी यावेळी दिली.

पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत शहरातल्या 213 सफाई कामगारांना प्रत्येकी 600 चौरस फुटांचं हक्काचं घर देण्यात येणार आहे. यासाठी पहिल्या टप्प्यात 56 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती पंढरपूर इथं सफाई कामगारांसोबतच्या दिवाळी फराळ कार्यक्रमात गोरे यांनी दिली.

आबिटकर-सांगली

जिल्ह्यात आटपाडी तालुक्यातल्या पिंपरी खुर्द इथं आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. यावेळी बोलताना आबिटकर म्हणाले.....

भविष्यकाळामध्ये पुढच्या सहा महिन्यामध्ये सुद्धा एकूण दुष्काळाची जी परिस्थिती राहील त्या सगळ्या परिस्थितीसाठी शासनानं जे काही नियोजन केले त्या नियोजनाबरोबर सर्व शेतकऱ्यांना सुद्धा त्याच्यामध्ये सामावून घेणं

दुष्काळाच्या झळा जास्त बसू नयेत यासाठी ज्या ज्या काही उपाययोजना करायला पाहिजेत त्या सुद्धा करण्याची एकूण शासनाची भूमिका सर्व शेतकऱ्यांशी संवाद साधून आम्ही योग्य पद्धतीने नियोजन केलेलं आहे.

राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री तसंच सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी काल जत तालुक्यातल्या बालगाव इथल्या शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी जळगांव जिल्ह्यात यावल तालुक्यातील बोरमळी इथं आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी केली.

गोकुळ

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ, अर्थात गोकुळच्या अध्यक्षपदाची निवडणूक नियोजित वेळापत्रकानुसार आज होणार आहे. शासननियुक्त चार संचालकांची मतं स्वतंत्र ठेवण्याचे आदेश, काल मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठानं दिले. या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचं चित्रीकरण करण्याचे निर्देशही खंडपीठानं दिले आहेत.

शासननियुक्त संचालकांना मतदानाचा अधिकार देणाऱ्या राज्य सरकारच्या अध्यादेशाला स्थगिती देण्याची याचिकाकर्त्यांची मागणी खंडपीठानं मान्य केली नाही. त्यामुळे निर्वाचित 25 संचालकांसह शासन नियुक्त चार संचालकांनाही मतदान करता येणार आहे.

राज्य सरकारनं जारी केलेला अध्यादेश कायदेशीरदृष्ट्या योग्य आहे की नाही, याबाबत न्यायालयानं काल कोणताही अंतिम निष्कर्ष दिलेला नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी 25 नोव्हेंबर रोजी होणार आहे. निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर निकाल जाहीर करून अध्यक्षांची निवड करण्यात येईल. मात्र ही संपूर्ण प्रक्रिया आणि तिचा निकाल न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. याचिकाकर्त्यांचे वकील श्रीकृष्ण गणबावले यांनी काल सुनावणीनंतर ही माहिती दिली. दरम्यान काल कोल्हापूरात राज्य सरकारच्या अध्यादेशाला विरोध करणारे मोर्चे आणि निदर्शनं झाल्याचं आमच्या वार्ताहरांनं कळवलं आहे.

दिवाळी

आज कार्तिक शुद्ध प्रतिपदा अर्थात विक्रम संवत्सर पाडवा आहे. आजच्या दिवसाला बलिप्रतिपदा असंही म्हटलं जातं. आज विविध मंदिरांतून अन्नकूट-गोवर्धन पूजा करण्यात येते. पती-पत्नीच्या नात्यातील गोडवाही पाडव्याच्या ओवळणीतून द्विगुणित होतो.

दिवाळीत दर्शन

छत्रपती संभाजीनगर शहरातल्या पिसादेवी परिसरात, मातालक्ष्मी, भगवान कुबेर आणि पत्नी भद्रा देवी यांच्या एकत्रित मूर्ती असलेलं मंदिर असून दिवाळीच्या काळात या मंदिरात दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असते. ऐकुया या विषयी अधिक माहिती आमचे प्रतिनिधी समीर पाठक यांच्याकडून.....

मराठवाड्यातील हे दुर्मिळ मंदिर वर्षभरातील प्रत्येक अमावास्येला तसेच दिवाळीतील धनत्रयोदशीपासून भाऊबीजेपर्यंत भाविकांसाठी खुले ठेवले जाते. एरवी मंदिराचे द्वार बंद ठेवले जातात. भद्रा देवीची येथे चित्रलेखा या नावानेही पूजा केली जाते. दिवाळीच्या काळात तिन्ही मूर्तींना रेशमी वस्त्रे आणि अलंकारांनी सजवून विशेष पूजा केली जाते. या दुर्मिळ मूर्तींच्या दर्शनासाठी दिवाळीत या मंदिरात दर्शन घेण्याची प्रथा अनेक भाविकांनी अनेक वर्षांपासून जोपासली आहे.

येडशी आग-धाराशिव

धाराशिव तालुक्यातील येडशी इथं रविवारी मध्यरात्री एका किराणा दुकानाला लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत करंडे कुटुंबियांचं किराणा दुकान आणि वरच्या मजल्यावरील राहतं घर या आगीत जळून

खाक झालं आहे. या आगीत घरात अडकलेल्या एकंदर सात जणांपैकी सहा जणांचा मृत्यू झाला असून या दुर्घटनेतून वाचलेल्या एकावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

फटाके आदेश-ठाणे

मुंबई सह ठाणे जिल्ह्यात हवेत उडणारे फटाके तसंच रॉकेट्स उडवण्याला बंदी घालण्यात आली आहे. विविध ठिकाणच्या आगीच्या घटनांमध्ये हवेत उडणारे फटाके हे देखील आग लागण्याचं एक मुख्य कारण असल्याचं निदर्शनास आलं आहे. त्यामुळे सुरक्षिततेचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

वायु प्रदूषणात वाढ

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात, दिवाळीच्या फटाक्यांमुळे वायु प्रदूषणात मोठी वाढ झाली आहे. फटाके वाजवण्यावर निर्बंध लावूनही आणि जनजागृती करूनही मोठ्या प्रमाणात फटाके फोडण्यात आल्याचं दिसून येत आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी संध्याकाळी मोठ्या प्रमाणात फटाके फोडल्यामुळे, शहराच्या अनेक भागांत धुराचे लोट पसरले होते. पुण्यापेक्षा पिंपरी-चिंचवडमधील हवेची गुणवत्ता अधिक खराब नोंदवण्यात आली. भारतीय उष्णदेशीय हवामानशास्त्र संस्था आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निरीक्षणानुसार, दिवाळीच्या पहिल्या तीन दिवसांत आठ नोव्हेंबरला सर्वाधिक वायुप्रदूषणाची नोंद झाली.

कर्करोग औषध

कर्करोगावर वापरल्या जाणाऱ्या 137 औषधांच्या कमी करण्यात आलेल्या किंमती कालपासून लागू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे कर्करुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणानं व्यापारी लाभाची मर्यादा निश्चित केल्यांनतर हे बदल होत आहेत. आतापर्यंत एक हजारांहून अधिक कर्करोगविरोधी औषधं प्रकारांच्या सुधारित कमाल किरकोळ किंमती जाहीर करण्यात आल्या आहेत.

दिवसा वीज

सौर कृषिपंप बसविण्याच्या बाबतीत राज्यानं देशात आघाडी घेतली आहे. देशातील एकंदर सौर कृषी पंपांपैकी 65 टक्के पंप महाराष्ट्रात बसविण्यात आले आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनं मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2 अंतर्गत वेगानं काम सुरू आहे. सध्या राज्यातील सुमारे 80 टक्के कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा केला जात आहे.

काट्यांची तपासणी

ऊस गाळप हंगामाच्या पार्श्वभूमीवर साखर कारखान्यांच्या वजनकाट्यांची तपासणी आणि सीलिंग प्रक्रिया वेगानं सुरू असून आतापर्यंत सहकारी आणि खासगी मिळून 162 साखर कारखान्यांच्या वजनकाट्यांची पडताळणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी राज्यातील सर्व प्रादेशिक साखर सहसंचालकांना यासंदर्भात सूचना दिल्या आहेत.

भूकंपाची नोंद-यवतमाळ

यवतमाळ जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील मौजा एकलासपूर इथं 3 रिख्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाची काल नोंद झाली. या भूकंपामुळे जिल्ह्यात कुठेही जीवित अथवा वित्तहानी झाल्याचं वृत्त नाही.

बुद्धीबळ

फिलिपाइन्स इथं काल झालेल्या 7 व्या आशियाई खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत विजेतेपद पटकावून भारताच्या अनुज श्रीवत्री यानं 100 वा ग्रँडमास्टर होण्याचा बहुमान पटकावला. अनुजच्या ह्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अखिल भारतीय बुद्धिबळ संस्थेचे अध्यक्ष नितीन नारंग यांनी त्याचं अभिनंदन केलं आहे.

क्रिकेट

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान पुरुषांच्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेतील तिसरा सामना आज हॅमिल्टन मध्ये सीडॅन पार्क इथं होणार आहे. 5 सामन्यांच्या या मालिकेतील सुरवातीचे 2 सामने जिंकत भारतानं आपलं वर्चस्व राखलं आहे.

हवामान

राज्यात येत्या 24 तासांत सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.